**माहितीचा अधिकार अधिनियमाच्या प्रभावी अंमलबजावणी संदर्भात ऑगस्ट २००९ च्या अंतिम सप्ताहात विशेष मोहिम राबविणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन,**
**ग्राम विकास व जलसंधारण विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक-कैंमाअ-२००९/प्र.क्र.९०/समन्वय कक्ष,**
**मंत्रालय मुंबई -४०० ०३२**
**दिनांक - ४ ऑगस्ट, २००९.**

**परिपत्रक**

**वाचा:-**

शासन आदेश सामान्य प्रशासन विभाग क्रमांक-२००९/६३१/प्र.क्र.२६७/०९/सहा,
दिनांक - २४ जुलै, २००९.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा कायदा दिनांक १२/१०/२००५ पासून अंमलात आला आहे. या अधिनियमातील कलम ४(१) (क) मधील तरतुदीप्रमाणे प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाने सर्व अभिलेख योग्य रीतीने सूचीबध्द करुन त्याची निर्देश सूची तयार करणे व संगणकीकरण करणे शक्य असेल अशा अभिलेखांचे वाजवी कालावधीत व साधन संपत्तीच्या उपलब्धतेनुसार संगणीकरण करणे व ही माहिती नेटवर्कवर उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. कलम ४(१) (ख) मधील तरतूदीनुसार हा अधिनियम अधिनियमीत झाल्यापासून १२० दिवसांच्या आत १७ बाबींवरील माहिती तयार करुन ती प्रसिध्द करणे आवश्यक होते. तसेच सदर माहिती वेळोवेळी अद्ययावतही करणे आवश्यक आहे. कलम ५(१) व ५(२) मधील तरतुदी पहाता सार्वजनिक प्राधिकरणांनी आवश्यक असतील तेवढया जास्तीत जास्त अधिका-यांना राज्य जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी म्हणून निर्देशित करणे आवश्यक आहे. शासनाने या कार्यवाहीबाबत वेळोवेळी सूचना निर्गमित केलेल्या आहेत. या उपरांत जनतेकडून या संदर्भात तक्रारी प्राप्त होत आहेत. दैनंदिन कामकाजाच्या व्यापामुळे अभिलेख सूचीबध्द करणे व त्यांची निर्देशसूची तयार करणे इ. कामे सार्वजनिक प्राधिकरणांनी पूर्ण न केल्याने माहिती पुरविण्यात विलंब होतो असे निदर्शनास आले आहे.

अभिलेख सूचीबध्द करणे व त्यांची निर्देशसूची तयार करणे या बाबींचे दीर्घकालीन महत्व विचारात घेता या कामासाठी विशेष मोहिम राबवून ते प्राथम्याने पूर्ण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत शासन आदेश सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-२००९/६३१/प्र.क्र.२६७/०९/सहा, दिनांक २४ जुलै, २००९ अन्वये आदेश देण्यात आले आहेत. या आदेशाच्या अनुषंगाने खालील प्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

(१) सर्व विभागीय आयुक्त कार्यालयातील उप आयुक्त(आस्थापना/विकास शाखा) व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व) यांनी ऑगस्ट २००९ मधील अंतिम सप्ताह हा अभिलेख सुचिबध्द करणे व त्यांची निर्देशसूची तयार करणे ही कामे या विशेष मोहिमे अंतर्गत प्राथम्याने हाती घ्यावीत. कार्यालयातील सर्वअभिलेखांची नोंदणी, विगतवारी करुन ते सर्व सुचिबध्द करण्यात यावेत व त्यांच्या निर्देशसूच्या तयार

करण्यांत याव्यात, तातडीच्या व अत्यावश्यक दैनंदिन बाबींकडे या मोहिमेमुळे दुर्लक्ष होणार नाही याचीही दक्षता त्यांनी घ्यावी.

(२) ज्या विभागीय आयुक्त कार्यालयातील उप आयुक्त(आस्थापना/विकास शाखा) व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी अद्याप कलम-४ च्या तरतुदींना अपेक्षित १७ बाबींवरील माहिती तयार करुन जनतेकरीता उपलब्ध केलेली नाही व शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द केलेली नाही. तसेच सहायक जन माहिती अधिकारी, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिका-यांना निर्देशित करुन त्यांचे फलक दर्शनी ठिकाणी लावले नाहीत अशा विभागीय आयुक्त कार्यालयातील उप आयुक्त(आस्थापना/विकास शाखा) व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी कोणत्याही परिस्थितीत **दिनांक ३१/८/२००९ पर्यन्त अशी कार्यवाही पूर्ण करावी. दिनांक ३१/८/२००९ नंतर याबाबत जनतेकडून तक्रार प्राप्त झाल्यास संबंधिताविरुध्द कठोर कार्यवाही करण्याची व संबंधित कार्यालय प्रमुखांच्या गोपनीय अहवालात तशी नोंद घेण्यात येईल, याची नोंद घेण्यात यावी.**

(३) सर्व विभागीय आयुक्त कार्यालयातील उप आयुक्त(आस्थापना/विकास शाखा) व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी त्यांच्या कार्यालयातील **सहाय्यक जन माहिती अधिकारी , जन माहिती अधिकारी/प्रथम अपिलीय प्राधिका-यांचे फलक दर्शनी ठिकाणी प्रदर्शित करणे , १७ बाबींची माहिती तयार करुन त्यास प्रसिध्दी देणे** या कामाकरीता नेमलेल्या संनियंत्रण अधिका-यांचे अहवाल शासनाकडे प्राप्त झालेले नाहीत. त्यामुळे सर्व विभागीय आयुक्त कार्यालयातील उप आयुक्त(आस्थापना/विकास शाखा) व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी त्यांच्या कार्यालयाच्या १०० टक्के अनुपालनासंदर्भातील संकलित अहवाल **दिनांक ३१/८/२००९** पर्यंत शासनास पाठवावेत. अहवाल पाठवितांना सर्व विभागीय आयुक्त कार्यालयातील उप आयुक्त(आस्थापना/विकास शाखा) व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी यादी व त्यांच्या कार्यपूर्ततेबाबतची नोंद त्यात असणे आवश्यक राहील.

(४) या शासन परिपत्रकाच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या कार्यवाहीचा आढावा अहवाल सर्व विभागीय आयुक्त कार्यालयातील उप आयुक्त(आस्थापना/विकास शाखा) व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी या विभागाकडे कोणत्याही परिस्थितीत दिनांक ३१.८.२००९ पर्यंत सादर करावा.

हे परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.govt.in या वेबसाईटवर संगणक सांकेतक क्रमांक २००९०८०४१८४३५५००१ वर प्रसिध्द करण्यात आलेले आहेत.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,**

**(र. ग. सय्यद)**
**शासनाचे उप सचिव.**

**प्रत**

१)विभागीय आयुक्त कोकण विभाग/नाशिक विभाग/पुणे विभाग/औरंगाबाद विभाग/ नागपूर विभाग/अमरावती विभाग.

२) विभागीय आयुक्त कोकण विभाग/नाशिक विभाग/पुणे विभाग/औरंगाबाद विभाग/ नागपूर विभाग/अमरावती विभाग यांच्या कार्यालयातील उपायुक्त (आस्थापना/विकास)

३) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.

४) सर्व सहसचिव/उपसचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग,मंत्रालय, मुंबई -३२

५) सर्व अवर सचिव/कक्ष अधिकारी, ग्राम विकास व जलसंधारण विभाग,मंत्रालय, मुंबई-३२

६) अवर सचिव, जल-२३ कार्यासन, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय मुंबई -३२.

७) मा. प्रधान सचिव(जलसंधारण) ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय मुंबई यांचे स्वीय सहायक.

८) मा.सचिव(ग्राम विकास) ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय मुंबई यांचे स्वीय सहायक.